# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०१७ / फाल्गुन ३०, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) आदिवासी विकास मंत्री**<br>**(२) उद्योग व खनिकर्म मंत्री**<br>**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(४) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**<br>**(५) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४०**

---

### कोल्हापूर जिल्हयातील शेतकऱ्यांची कर्जे माफ करण्याबाबत

**(१) * २९३२५ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या सन २००८ च्या निर्णयानुसार कोल्हापुर जिल्हयांतील ४४ हजार ६५९ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची रुपये ११२ कोटी ८९ लाख इतकी रक्कम वसुल करण्याचा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी रद्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर जिल्हयातील कर्ज मर्यादेचा निकर्ष लावून माफ न झालेल्या शेतकऱ्यांची सन २००७-०८ मधील मंजूर आणि थकीत कर्जे शासन माफ करणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.४३९९/२०१३ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३१/०१/२०१७ रोजी दिलेला निर्णय कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संबंधात असल्याने इतर जिल्हयांना लाभ देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी जिल्हयातील जात पडताळणीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(२) * २७७११ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील सुमारे ५००० पेक्षा अधिक जात पडताळणीचे प्रस्ताव औरंगाबाद येथील कार्यालयात प्रलंबित असल्याने जिल्हयातील विद्यार्थी व इतरांना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हास्तरीय जात पडताळणी कार्यालयात आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने जिल्हा अध्यक्ष व सचिव यांच्यास्तरावरूनही सक्षम उपाययोजना व कार्यवाही होत नसल्याने जात पडताळणीच्या प्रस्तावास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी, २०१७ अखेर एकूण ४११४ प्राप्त प्रकरणांपैकी ६४५ प्रकरणी वैधतेबाबत निर्णय झाला असून १२६० प्रकरणे अर्जदारांच्या स्तरावर त्रुटी पूर्ततेकरिता प्रलंबित आहेत. उर्वरित प्रकरणी कार्यवाही चालू आहे.

(२) हे खरे नाही.

अतिरिक्त कार्यभाराद्‌वारे प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत. तसेच जिल्हास्तरीय जात पडताळणी समिती कार्यालयास कंत्राटी पध्दतीने आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खरबी (जि.भंडारा) येथील दि विदर्भ ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्थेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(३) * २९३५०   श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरबी (जि.भंडारा) येथील दि विदर्भ ग्रामिण बिगर शेती सहकारी पत संस्थेत रुपये १८ लाख ८९ हजार ८९० रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, लेखा परिक्षक यांनी याबाबत पोलीसात गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) होय.

(३) संस्थेच्या थकीत कर्जवसूली संबंधाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये वसूली अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असून वसूलीची कार्यवाही सुरु आहे. सदर संस्था आर्थिक अडचणीत आल्यामुळे बंद आहे. त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अवसायनात काढण्यात आलेली असून दिनांक २७/२/२०१७ रोजी अवसायकाची नियुक्ती केलेली आहे.

संस्थेच्या आर्थिक नुकसानीबाबत संचालक मंडळ व संस्थेचे अधिकारी यांचेकडून करावयाच्या वसुलीसंबंधाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये दिनांक २/२/२०१७ रोजी आदेश पारीत केलेला असून चौकशी साठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुर्णा (जि.परभणी) येथील शासकीय वसतिगृहातील मुलीवर बलात्कार झाल्याबाबत

**(४) * २९७९१ श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा (जि.परभणी) गावाच्या बाहेरील पांगरा ढोणे रोडवरील शासकीय वसतिगृहातील १७ वर्षीय मुलीवर बलात्कार झाल्याचे दिनांक ५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर व वसतिगृहाच्या व्यवस्थापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक ०४/०२/२०१७ रोजी पिडीत मुलीने पोलीस स्टेशन पुर्णा येथे समक्ष उपस्थित राहुन लेखी तक्रार दिल्याने रजि. नं. २९/२०१७ कलम ३७६, ३२३, ५०६ भा.दं.वि. सह कलम ३४ पोस्को व ३ (१) (w) अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून उपविभागीय अधिकारी पुर्णा यांच्यामार्फत पुढील तपास चालू आहे. सदरील पिडीत मुलगी दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी सकाळी कॉलेजला जात असल्याची नोंद नोंदवहीवर करुन गेली होती. वसतिगृहात येण्याची वेळ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आहे. सायंकाळी ६ वाजल्यानंतर सदरील पिडीत विद्यार्थीनी वसतिगृहात आली नसल्याने वसतिगृह गृहपालांनी तिच्या पालकांशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून विचारणा केली असता सदरील मुलगी पालकांसोबत असल्याचे सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे वसतिगृह गृहपाल दोषी आढळुन येत नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) येथील स्मारकाच्या देखभाल दुरूस्तीचे काम अन्य संस्थेकडे हस्तांतरीत करण्याबाबत**

**(५) * २९४५०  श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २१२५३ ला दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (ता.महाड, जि.रायगड) शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी शासनाने रूपये १५ कोटी खर्च करून उभारण्यात आलेल्या स्मारकाच्या आवारात रूपये ३० लाख खर्च करून बांधण्यात आलेल्या तरण तलावाची देखभाल होत नसल्याने तलावावर हिरव्या रंगाच्या शेवाळाचे तरंग पसरले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेवाळामुळे डासांचा उपद्रव होऊन महाड शहरात रोगराई पसरण्याची निर्माण झालेली परिस्थिती तसेच अनेक सेवा-सुविधांचा अभाव असल्याने समाजकल्याण विभागाने पुण्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण आणि संशोधन (बार्टी) प्रशासनाकडून स्मारकाची देखभाल दुरूस्तीची जबाबदारी अन्य संस्थेकडे हस्तांतरीत करण्याची मागणी विविध क्षेत्रातून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक बचाव कृति समिती महाड यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जागेचा विविध बाबींसाठी सुयोग्य वापर करण्याबाबत महासंचालक बार्टी, पुणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार तरण तलाव दुरुस्तीसाठी महासंचालक बार्टी, पुणे यांच्याकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांच्याकडे आवश्यक निधी वर्ग करण्यात आला असून, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अनुषंगिक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शासकीय/निमशासकीय सेवेत असलेल्या पालकांच्या पाल्यांना नामांकित शाळेत प्रवेश न देण्याबाबत**

**(६) * २९७२१ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय/निमशासकीय सेवेत असलेल्या पालकांच्या पाल्यांना नामांकित शाळेत प्रवेश देवू नयेत किंवा प्रवेश रद्द करावा असे निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे शासनाच्या अनुसूचित जमातीच्या मुलांना नामांकित इंग्रजी शाळांत प्रवेश देण्याच्या योजनेनुसार नागपूर येथील तुली पब्लिक स्कुलमध्ये शिकत असलेल्या एका आदिवासी विद्यार्थीनीची परिक्षा सुरु असताना शाळेतील प्रवेश रद्द केल्याने या विद्यार्थीनीचे भविष्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या विद्यार्थीनीच्या पालकांनी याविरोधात प्रकल्प कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विद्यार्थीनीचा शाळा प्रवेश रद्द न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर विद्यार्थीनीच्या पालकांनी उपोषणाचा इशारा दिला होता, परंतु प्रत्यक्षात उपोषण केलेले नाही.

(४) नामांकित निवासी शाळा योजनेंतर्गत रूपये एक लाखापेक्षा कमी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. प्रस्तुत प्रकरणी प्रकल्प अधिकारी, चिमूर यांचेकडून केलेल्या चौकशीमध्ये सदर विद्यार्थीनीच्या पालकांनी स्वत:चा उत्पन्नाचा दाखला न देता आपल्या वडीलांचा दारिद्रयरेषेखालचा दाखला जोडून प्रवेश मिळविल्याचे निदर्शनास आले. प्रकरणी विद्यार्थीनीचे पालक शासन सेवेत असल्याने त्यांचे उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा जास्त होत असल्याने सदर विद्यार्थीनीस नामांकित निवासी शाळा या योजनेतून लाभ देण्याबाबत वगळण्यात आले तथापि, तिचा प्रवेश रद्द करण्यात आलेला नसून सदयस्थितीत पालकांच्या स्वखर्चाने विद्यार्थीनी त्याच शाळेत शिक्षण घेत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दिग्रस (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून फसवणूक होत असल्याबाबत**

**(७) * २९२७२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस (जि.यवतमाळ) तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी कापूस, सोयाबीन इत्यादी विक्रीसाठी आणले असता व्यापाऱ्यांकडून त्यांची फसवणूक केली जात असल्याने शेतकऱ्यांनी तहसिलदार, दिग्रस यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, दुरध्वनीवरुन निनावी तक्रार केली होती.

(२) व (३) होय, प्रत्यक्ष घटनास्थळी तक्रारदार तथा व्यापाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते, परंतू कोणीही समोर आले नाही. त्यामुळे सहकार जिनिंग फॅक्टरीसमोर बेवारस पडलेला ३.९५ क्विंटल कापूस सुपूर्दनाम्यावर बाजार समितीच्या नावाने ठेवण्यात आला आहे.

-----------------

**कोकणासाठी आंबा व काजू बोर्ड स्थापन करण्याबाबत**

**(८) * २९४७० श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कोकणासाठी आंबा व काजू बोर्ड स्थापन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंबा व काजू बोर्ड कार्यान्वित झाले आहे काय, त्यासाठी किती निधी मंजूर झाला आहे

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आंबा व काजू बोर्ड स्थापन करून कोकणातील शेतकऱ्यांना याचा फायदा होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) आंबा व काजू मंडळ, पणन विभागाने स्थापन केल्याच्या दिनांक २४/०१/२०१४ रोजीच्या शासन निर्णयाच्या वैधतेबाबत विधी व न्याय विभागाने काही मुद्दे उपस्थित केल्यामुळे आंबा व काजू मंडळाची नोंदणी प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळांतर्गत स्वतंत्र आंबा व काजू कक्ष (सेल) स्थापन करण्यात आला आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत आंबा अर्कसाका निवारक प्रक्षेत्र चाचणीसाठी रुपये ४६.१० लाखाचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त खर्च पणन मंडळामार्फत करण्यात येत आहे.

(३) अपेडा अर्थसहाय्यीत फळमाशी नियंत्रणासाठी रुपये २९.८६ लाख रकमेचा प्रकल्प अहवाल अपेडाला सादर करण्यात आला आहे. हापूस आंब्यातील साका समस्या दूर करण्यासाठी तीन कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. गोरेगाव येथे निर्यात सुविधा केंद्रावर Hot Water Treatment सुविधेची उभारणी व प्रमाणिकरण करण्यात येत आहे. जयगड पोर्ट वरुन आंबा निर्यात सुरु करण्याचे दृष्टीने जिंदाल पोर्ट वर उपलब्ध सुविधांची पाहणी व निर्यातदार तसेच जिंदाल पोर्टचे प्रतिनिधींसमवेत चर्चा करण्यात आली आहे. काजू निर्यात करण्याच्यादृष्टीने काजू प्रक्रियाकार व निर्यातदार यांच्या थेट समन्वयातून निर्यातीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निंबोनी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील विद्युत वाहिन्यांचे काम पूर्ण करण्याबाबत

**(९) * २९९४३ श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निंबोनी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील १३२ के.व्ही. सबस्टेशचे सन २०१०-११ मध्ये काम पूर्ण होऊनही विद्युत वाहिन्यांचे काम अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्युत वाहिन्यांचे काम पूर्ण होण्यासाठी शासनाने कोणती निर्णयात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) १३२ के.व्ही. निंबोनी उपकेंद्राचे काम सन २०१५-१६ मध्ये पूर्ण झाले आहे. तसेच १३२ के.व्ही. पंढरपूर-मंगळवेढा वाहिनीवर निंबोनी उपकेंद्रासाठी लिलो पध्दतीने वाहिनी उभारण्याचे काम ४५% झालेले आहे. तथापि, काही शेतमालकांकडून वाहिनीच्या कामास विरोध होत असल्याने, वाहिनीचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी महापारेषण कंपनीने जिल्हाधिकारी, सोलापूर व उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांच्याकडे भारतीय टेलिग्राफ कायदा, १८८५ च्या कलम १६/१ अन्वये सुनावणी अर्ज दाखल केले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांनी सुनावण्या घेतल्या असून दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी आदेश पारित केले आहेत. त्यानुषंगाने नुकसान भरपाई अदा करुन वाहिनीचे काम महापारेषण कंपनीकडून लवकरच हाती घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**निलंगा (जि.लातूर) येथील वसतिगृहातील गैरप्रकाराबाबत**

**(१०) * ३०१३८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निलंगा (जि.लातूर) येथे समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहात अनेक गैरप्रकार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार सुरक्षारक्षकाने समाजकल्याण विभाग, पोलीस अधिक्षक कार्यालय, लातूर व जिल्हाधिकारी, लातूर यांचेकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर वसतिगृहातील गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी तक्रार केलेली महिला सुरक्षारक्षक या आपल्या कर्तव्यात कसूर करीत असल्याने गृहपालांनी बि.व्ही.जी. बाह्यस्त्रोत कर्मचारी कंपनीस कळविले असता सदर कंपनीने त्या महिला सुरक्षारक्षकास कामावरून कमी केले, त्यामुळे संबंधित महिला सुरक्षारक्षकाने वसतिगृह प्रशासनाच्या विरोधात खोट्या तक्रारी करणे, वृत्तपत्रात बातम्या देणे असे प्रकार केल्याने मा. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर यांचे स्तरावरून त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली. चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर महिला सुरक्षारक्षक श्रीमती. महानंदा प्रकाश जाधव यांच्या तक्रारींमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नसल्याचे चौकशी समितीने स्पष्ट केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये अवैधरित्या भूखंड वाटप झाल्याबाबत**

**(११) * २७२३३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये प्लॉट नं.T-१८८ आणि F-२/५६ हे भूखंड अवैधरित्या वाटप झाल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून क्लस्टर योजनेस मान्यता न घेता सदर भूखंड सवलतीच्या दरात संस्थेला वाटप केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्लस्टर मंजूर नसताना संस्थाना बी.सी.सी. देण्यात आलेल्या भूखंडाचे सवलत मूल्य देखील वसूल केले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भूखंड वाटप प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) प्रश्नात विचारलेल्या भूखंड क्र. एफ-२/५६ नसून सदरचा भूखंड क्र. एफ-२-५७/१, क्षेत्र-७२३७ चौ.मी. असा आहे. मे. वुमन्स इंटरप्रिनर्स इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को.ऑप.सोसा.लि. या संस्थेस संचालक मंडळाच्या मान्यतेने सदरील भूखंड क्र. एफ-२-५७/१ क्षेत्र-७२३७ चौ.मी. व टी-१८८ क्षेत्र-६७६३ चौ.मी. असे एकूण क्षेत्र-१४००० चौ.मी. वितरीत करण्यात आले आहे.

(२) सदर संस्थेस क्लटर योजनेंतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहुन सवलतीच्या दराने क्षेत्र-१४००० चौ.मी. भूखंडाचे वितरण करण्यात आले आहे.

(३), (४) व (५) ७० सभासद असलेल्या या संस्थेस १४००० चौ.मी. भूखंडाचे ५०% सवलतीच्या दरात वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी १५ सभासदांना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यात आला आहे. सदरील संस्थेला वितरीत करण्यात आलेल्या भूखंडासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये नोंदणीकृत संस्थेच्या सभासद, श्रीमती. स्वाती रविंद्र शिंदे यांनी याचिका दाखल केली आहे. तसेच श्री.जितेंद्र ननावरे, माजी नगरसेवक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा कमी करण्याबाबत**

**(१२) * २७३८४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वृध्द नागरिकांना शासनामार्फत दरमहा रक्कम रुपये ६००/- इतके अनुदान देण्यात येत असून सुमारे २५ लाख वृध्द नागरिकांना याचा लाभ मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा सध्याच्या ६५ वर्षाऐवजी ६० वर्षे निर्धारित करण्यात यावी अशी मागणी मागील अनेक वर्षापासून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

विशेष सहाय्य कार्यक्रमांतर्गतच्या विविध योजनांमध्ये सुमारे २८ लक्ष निराधार, अपंग, रोगग्रस्त व वृध्द व्यक्तींना दरमहा रुपये ६००/- अनुदान देण्यात येते.

(२) होय.

(३) ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६५ वर्षाऐवजी ६० वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील वीज वितरण कंपन्या आर्थिकदृष्टया सक्षम करण्याबाबत**

**(१३) * ३००५४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज गळतीचे प्रमाण तीन टक्क्यांनी कमी करण्याची योजना आखण्यात आली असून सदर योजनेमुळे रुपये १ हजार २०० कोटींची बचत होणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेव्दारे वीज कंपन्यांची कार्यक्षमता वाढवून सन २०१९ पर्यंत सर्वांना अखंड वीज पुरवठा करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज गळतीचे प्रमाण कमी करुन डबघाईला आलेल्या वीज वितरण कंपन्या आर्थिकदृष्टया सक्षम करण्यासाठी सदर योजना अंमलात आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ च्या वीज दर आदेशानुसार महावितरण कंपनीसाठी वितरण हानीचे प्रमाण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार महावितरण कंपनीस आर्थिक वर्ष २०१६-१७ ते सन २०१८-१९ या तीन वर्षाच्या कालावधीत ३% पर्यंत वितरण हानी कमी करावयाची आहे.

(२) आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून वीजेची उपलब्धता मागणीपेक्षा जास्त असल्यामुळे राज्यात कुठे भारनियमन करण्यात येत नाही. सन २०१९ पर्यंत अखंडीत वीज पुरवठा करण्यात येईल.

(३) तांत्रिक हानी कमी करण्यासाठी महावितरण कंपनीने नवीन उपकेंद्रांची उभारणी, नवीन उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्या, नवीन रोहित्रे, अस्तित्वातील उपकेंद्रांची क्षमता वाढविणे इत्यादी कामांचा समावेश पायाभूत आराखडा-२, दिनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजना, आयपीडीएस, तसेच जिल्हा योजनेंतर्गत केला आहे. वाणिज्यिक हानीचे प्रमाण कमी करण्यासाठी सुरक्षा व दक्षता विभागांतर्गत ४३ भरारी पथके तयार करण्यात आली असून वीज चोरी प्रकरणे हाताळण्यासाठी ६ स्वतंत्र पोलीस स्थानकांची स्थापना, वीज चोरी पकडण्याची नियमित मोहिम चालू ठेवणे इत्यादी उपाययोजनाद्वारे महावितरण कंपनी वीज गळतीवर नियंत्रण ठेवत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

------------------

**गुहागर (जि.रत्नागिरी) व रोहा (जि.रायगड) येथे उभारण्यात येणाऱ्या मेगा रिफायनरी प्रकल्पाबाबत**

**(१४) * २७४७८ श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २४९४१ ला दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) व रोहा (जि.रायगड) येथे उभारण्यात येणाऱ्या इंडियन ऑईल पेट्रोकेमिकल्स कंपनी लि. व हिंदुस्थान पेट्रोकेमिकल्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यामध्ये प्रस्तावित असलेल्या मेगा रिफायनरी प्रकल्पासाठी स्थळ निश्चित करण्यासंदर्भात मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकल्पासाठी जागा निश्चित केली आहे काय, सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथे उभारण्यात येणाऱ्या मेगा रिफायनरी प्रकल्पासाठी स्थळ निश्चित करण्यासंदर्भात मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०९/२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे.

(२) प्रकल्पासाठी स्थळ निश्चित करण्यात आले आहे. प्रकल्प केंद्र शासनाच्या ऑईल कंपन्यांकडून पूर्ण करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात महावितरण कंपनीतील उपकार्यकारी अभियंत्याने आत्महत्या केल्याबाबत**

**(१५) * ३०४६२ श्री.आनंदराव पाटील** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात महावितरण कंपनीतील वरिष्ठ अधिका-यांच्या मनमानी कारभारास कंटाळून उपकार्यकारी अभियंत्याने गळफास घेवून आत्महत्या केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाने कामाच्या तुलनेत मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे या प्रमुख मागण्यांसाठी येथील महावितरणच्या अधिकारी व कर्मचारी यांनी सामूहिक रजा आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने दोषी अधिका-यांवर कारवाई करणे तसेच आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) श्री.पानसरे, उपकार्यकारी अभियंता यांच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास सुरु आहे.

(२) अधिकाऱ्यांच्या संघटनेने श्री.पानसरे यांच्या मृत्यूबाबत जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करावे, त्यांची चौकशी करुन कारवाई करावी इत्यादी मागण्यांकरीता माहे जानेवारी, २०१७ मध्ये रजा आंदोलन केले होते.

(३) याप्रकरणी महावितरण कंपनीने नियुक्त केलेल्या प्राथमिक चौकशी समितीच्या अहवालाच्या निष्कर्षावरुन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांना कंपनीने निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही सुरु केली आहे. तसेच रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नोटाबंदी धोरणामुळे चर्मोद्योग व्यवसायात घसरण झाल्याबाबत

**(१६) * २९८९९ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, पुणे, सातारा, सांगली व कोल्हापूर या भागात केंद्र शासनाच्या नोटाबंदी धोरणामुळे तेजीमध्ये असलेल्या चर्मोद्योग व्यवसायात ७० ते ८० टक्के घसरण झाली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर उद्योगांना पुनर्जिवीत करुन नियमित सुरु ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या अहवालानुसार माहे ऑक्टोबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत चर्मोद्योग वस्तुंच्या विक्रीमध्ये कोणत्याही प्रकारची घसरण झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांद्रा (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील झोपडपट्टी वसाहतीमध्ये वीज पुरवठा करण्याबाबत**

**(१७) * २९४६३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांद्रा (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील पश्चिमेस असलेल्या झोपडपट्टीतील ५० कुटुंबे मागील २० वर्षापासून अंधारात राहात असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागात राहणाऱ्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाकीची असल्याने वीज खांबासाठी लागणारे पैसेही ते भरु शकत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनाच्या निधीतून सदर कुटुंबांना वीज देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

मौजे नांद्रा (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील सरपंच ग्रामपंचायत नांद्रा यांच्या ठरावामधील नमूद २१ अर्जदारांसह एकूण २६ अर्जदारांना अनामत रक्कम भरण्यासाठी महावितरण कंपनीकडून मागणी पत्र देण्यात आलेले असून त्यापैकी भरणा केलेल्या १० अर्जदारांना डीपीडीसी (ओटीएसपी) निधी अंतर्गत विद्युत वाहिनी व वितरण रोहित्र उभारुन वीज पुरवठा दिनांक २०/०२/२०१७ रोजी देण्यात आला आहे. उर्वरित १६ अर्जदारांना कोटेशननुसार अनामत रक्कमेचा भरणा केल्यांनतर वीज जोडणी देण्यात येईल.
(२) सदर ग्राहकांच्या विद्युतीकरणाची कामे डिपीडीसी (ओटिएसपी) योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामुळे ग्राहकांना वीज खांबांसाठी या योजनेंतर्गत पैसे भरण्याची आवश्यकता नाही.

(३) सदर कुटुंबांना व नांद्रा झोपडपट्टी येथील सर्व संभाव्य वीज ग्राहकांना डिपीडीसी (ओटिएसपी) या योजनेंतर्गत समाविष्ट करण्यात आले असून, संबंधितांनी मागणी पत्रकाप्रमाणे अनामत रक्कमेचा भरणा केल्यास त्यांना वीज जोडणी करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित व अनुदानित शाळांना निवासी दराने वीज पुरवठा करणेबाबत

**(१८) * २८३६२ डॉ.अपूर्व हिरे, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक १५९४८ ला दिनांक १४ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षण संस्थांना मुंबई वीज शुल्क अधिनियम १९५८ यांच्या कलम ३ (iii a) नुसार विद्युत शुल्कातून सुट मिळण्यासाठी पुनश्च धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी करण्याची गरज नसल्याचे मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रविष्ट याचिका क्रमांक : ८२७०/२०१३ वरील सुनावणी दरम्यान आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा १९५० अंतर्गत नोंदणीकृत शिक्षण संस्था संचलित सर्वच अनुदानित, विनाअनुदानित शाळा-महाविद्यालयांना विद्युत शुल्कातुन सवलत मिळणे व निवासी दराने वीज पुरवठा करण्याच्या मागणी/विनंतीच्या संदर्भात मा.न्यायालयाने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळा-महाविद्यालयांना व्यावसायिक वाणिज्य दराऐवजी निवासी दराने वीज पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
न्यायालयाच्या आदेशामध्ये सर्व शाळा व महाविद्यालयांना विद्युत शुल्क सवलत व निवासी दराने विद्युत पुरवठा करण्याबाबतचा उल्लेख नाही.

(३) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निश्चित केलेल्या दरानुसार शाळा-महाविद्यालयांना सार्वजनिक सेवा या वर्गवारीनुसार वीज दर आकारणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील फुले उत्पादक शेतक-यांना गोडाऊन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१९) * २९६३५ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फुले उत्पादक शेतक-यांना निर्यात व साठवणूकीसाठी शास्त्रीय पध्दतीचे गोडाऊन उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी झेंडू फूलाला भाव नसल्याने माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान राज्यात अनेक ठिकाणी झेंडू फूले फेकून देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात तीन ठिकाणी फुले निर्यात सुविधा केंद्राची उभारणी केली आहे. या केंद्रांवरुन गुलाबाच्या फुलांची (स्टेम्स) निर्यात केली जाते. तथापी राज्यातून झेंडू या फुलाची निर्यात होत नाही. झेंडूची फुले प्रामुख्याने राज्यामध्ये दिवाळी, दसरा यासारख्या सणाकरीता वापरली जातात. चालू वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्याने मागणी व पुरवठा यामध्ये विसंगती निर्माण झाल्यामुळे दरात घसरण झालेली होती.

-----------------

**आदिवासी आश्रमशाळेतील अधिक्षकांना समाजकल्याण विभागातील अधिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(२०) * २७२३० प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम भागातील आदिवासी विभागांतर्गत आश्रमशाळेतील अधिक्षकांना समाजकल्याण विभागातील अधिक्षकांपेक्षा कमी वेतन मिळत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदिवासी आश्रमशाळेतील अधिक्षकांना समाजकल्याण विभागातील अधिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील पुरूष व महिला अधिक्षकांवर विद्यार्थ्यांची निवास विषयक जबाबदारी सोपविण्यात आली असून, आश्रमशाळेचा स्वतंत्र कार्यभार सोपविण्यात आलेला नाही. त्यामुळे आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतील पुरूष व महिला अधिक्षकांचे सहाव्या वेतन आयोगानुसार ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० या वेतनसंरचनेत वेतन निश्चित करण्यात आले आहे.

तथापि, समाजकल्याण विभागातील अधिक्षकांवर अपंग संस्था अथवा अंधशाळेमधील शिक्षण विभाग व निवास विभाग या दोन्ही प्रभागांची व एकंदरीत शाळेची सर्वांगीण प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी सोपविण्यात आलेली असल्यामुळे त्या पदाची वेतनसंरचना ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० अशी आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, दोन्ही विभागांच्या अधिक्षक पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या यामध्ये भिन्नता असल्यामुळे आदिवासी आश्रमशाळेतील अधिक्षकांना समाजकल्याण विभागातील अधिक्षकांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील मागासवर्गीय वसतिगृहाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२१) * २८४३० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील ७३ वर्षापुर्वी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृहाचे अनुदान मागील दोन वर्षापासून केवळ मूळ मान्यता आदेश मिळत नसल्याच्या कारणावरुन सोलापूर जिल्हा परिषद, समाजकल्याण विभागाने दिले नसल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे विभागीय कार्यालयाकडून देखील सहकार्य मिळत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

सदर बाब २१ जानेवारी, २०१७ पूर्वीच निदर्शनास आली आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) यासंदर्भात शासनस्तरावर बैठक आयोजित करण्यात येऊन सदर प्रकरणी प्रादेशिक उपायुक्त यांचेस्तरावर सुनावणी घेऊन आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांनी स्वयंस्पष्ट अहवाल शासनास निर्णयार्थ सादर करावा असे ठरले आहे, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिंपेटाकळी (जि.बीड) येथील रामनगर आश्रमशाळेतील विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार झाल्याबाबत**

**(२२) * ३०४२२ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिंपेटाकळी (जि.बीड) येथील रामनगर माध्यमिक आश्रमशाळेत दहावीत शिकणा-या विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार झाल्याने वर्गशिक्षकाने तिला अस्पृश्यतेची वागणूक देऊन तिच्या अशिक्षित आईचा अंगठा घेवून सदर विद्यार्थीनीला शाळेतून काढण्याचा प्रयत्न केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थीनीने आपल्यामुळे शाळेची बदनामी होत असेल तर शासनाने आपल्याला आत्महत्येची परवानगी दयावी अशी मागणी करणारा अर्ज तहसिलदार यांना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर विद्यार्थीनीवर अत्याचार करणारे तसेच शाळेतून काढण्याचा प्रयत्न करणा-या वर्गशिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) सदर विद्यार्थीनीस माध्यमिक आश्रमशाळेतून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला, हे खरे आहे.

तथापि तिला अस्पृश्याची वागणूक दिली, हे खरे नाही.

(२) होय.

(३) सदर विद्यार्थीनी विजाभज माध्यमिक आश्रमशाळेत अनिवासी विद्यार्थीनी आहे. आश्रमशाळाबाहय प्रकरणात अतिप्रसंगामुळे तिला गर्भधारणा होऊन ती प्रसुत झाली. याप्रकरणातील आरोपी श्री.भागवत तुळशीराम कुंडकर यास अटक करण्यात आली असून, त्यांचेविरोधात पोलीस स्टेशन माजलगांव येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच संबंधित मुख्याध्यापिका श्रीमती रुपाली राठोड व वर्गशिक्षक श्री.सी.व्ही.मठपती यांची १ वार्षिक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाला न्यायालयीन अधिकार (ज्युडिसियल पॉवर) मिळण्याबाबत

**(२३) * ३००९७ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोगाला न्यायालयीन अधिकार (ज्युडिसियल पॉवर) मिळण्यासंदर्भात शासनाकडे प्रस्ताव दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने प्रलंबित प्रकरणे निकालात काढण्याबाबत अनुसूचित जाती/जमाती आयोगाला न्यायालयीन अधिकार (ज्युडिसियल पॉवर) देण्याबाबत समर्थन या संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.सामाजिक न्याय मंत्री तसेच सचिव, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) याबाबतच्या प्रस्तावाची छाननी करण्याची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा देखरेख संघात झालेल्या संगणक खरेदी गैरव्यवहाराची पुर्नचौकशी करण्याबाबत

**(२४) * २७७७७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक १९७५६ ला दिनांक २२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा मध्यवर्ती बँक व जिल्हा देखरेख संघात झालेल्या संगणक खरेदी गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी नियुक्त केलेल्या चौकशी अधिकाऱ्यांनी संस्थेचे संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याबाबतचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, परभणी यांच्याकडे सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २७ मार्च, २००८ रोजीच्या चौकशी अहवालाप्रमाणे कारवाई न करता दोषींना पाठीशी घालण्यासाठी कलम ८८ प्रमाणे सोयीस्कररित्या अहवाल तयार करण्यात आला असल्याची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा उपनिबंधक, परभणी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारीवरून वरील प्रकरणांची पुर्नचौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते श्री.बी.जी.काळे पाटील यांनी केलेली सदरची तक्रार जिल्हा उपनिबंधक, परभणी यांना दिनांक २०/०२/२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे.

(३) जिल्हा उपनिबंधक, परभणी यांच्यावतीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३(१) अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार व चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार कलम ८८ अन्वये चौकशी करण्यात आली. त्यामध्ये चौकशी अधिकारी यांनी नियम ७२(१) व ७२(२) नुसार जबाबदारी निश्चिती पूर्वीची नोटीस काढून संबंधितांचे खुलाशावरून चौकशी अधिकारी यांनी दोषींवर त्याच्या चौकशी अहवालामध्ये कोणतेही दोष नमूद केलेले नसल्यामुळे व संचालक/पदाधिकारी/कर्मचारी यांच्यांवर वैयक्तिक कोणत्याही प्रकारची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता नाही अशी चौकशी अधिकारी यांची खात्री झाल्याने नियम ७२(१) व ७२(२) नुसार चौकशी पूर्ण करण्यात आली व सदरील अहवाल जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी स्वीकृत केला आहे. सदर अहवालास विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडे कोणीही आव्हानीत केलेले नाही. त्यामुळे पुढील चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तक्रारदार श्री.बी.जी.काळे पाटील यांना जिल्हा उपनिबंधक, परभणी यांच्यावतीने दिनांक ०३/०३/२०१७ रोजी अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२५) * ३०३४९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या आस्थापनेवरील विविध ३३५ रिक्त पदे भरण्यासाठी खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी प्रत्येक उमेदवाराकडून रुपये ४५० डीडी स्वरुपात फी आकारण्यात आली असून ६० हजार विद्यार्थ्यांची चार वर्षापूर्वी लेखी परिक्षा होऊन देखील सदर रिक्त पदे भरण्यात आली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परीक्षेसाठी उमेदवारांकडून आकारण्यात आलेली फी परत करणे व सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय.

मंडळाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता आवश्यक जाहिरात देऊन अर्ज प्राप्त करून घेऊन पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेऊन त्याचा निकाल जाहीर करण्याकरीता भरती प्रकिया राबविण्याची जबाबदारी मंडळाने महाराष्ट्र ज्ञानमंडळ महामंडळ, पुणे या संस्थेवर सोपविली होती. सदर संस्थेने संबंधित अर्जदारांकडून प्रत्येकी रुपये ३००/- याप्रमाणे परिक्षा शुल्कापोटी फी आकारली आहे.

(२) व (३) मंडळाच्या आस्थापनेवरील रिक्त पदे भरण्याबाबत मंडळाने महाराष्ट्र ज्ञानमंडळ महामंडळ, पुणे या संस्थेमार्फत भरती प्रकियेची कार्यवाही सुरू असतांना भरती प्रक्रियेचा आढावा घेण्यासाठी सचिव तथा विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १२/०९/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत पदांचा फेरआढावा घेऊन प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली असता दरम्यानच्या काळात घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेचा निकाल तात्काळ जाहीर करण्याबाबत परिक्षार्थ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ६२९०/२०१४ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**नेर (जि.यवतमाळ) तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थींना थकीत रक्कम अदा करण्याबाबत**

**(२६) * २९२७५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेर (जि.यवतमाळ) तालुक्यात ८ हजारापेक्षा जास्त लाभार्थींना संजय गांधी निराधार योजनेची रक्कम मागील दोन महिन्यापासून देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधितांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) व (४) नेर जि.यवतमाळ तहसिल कार्यालयातील संजय गांधी शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांना जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यासाठी नियुक्त केल्यामुळे जानेवारी, २०१७ या एका महिन्याचे अनुदान वेळेवर काढता आले नाही. परंतु, निवडणूक कालावधी संपताच माहे जानेवारी, २०१७ चे अनुदान माहे फेब्रुवारी, २०१७ च्या अनुदानासोबत दिनांक २७/०२/२०१७ रोजी वितरीत करण्यात आले आहे.

-----------------

**मुंबईतील कामाठीपुरा येथील अवैध कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२७) * ३०१४० श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कामाठीपुरा येथे अनेक लहान-मोठे अवैध कारखाने सुरु असून सदर कारखान्यात जीन्स धुऊन त्यांना रंग देण्यासाठी पाण्याची मोठया प्रमाणात चोरी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कारखान्याच्या व्यवस्थापकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कामाठीपुरा येथे जीन्सचे कारखाने असून त्यासाठी पाण्याची चोरी केली जात असल्याबाबतची बातमी दिनांक ५/१२/२०१६ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती वस्तुस्थिती आहे.

(२) सदर ठिकाणी पाणी चोरीबाबतच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्यानंतर, आजुबाजुच्या चाळीतील पाणी पुरवठयावर परिणाम होऊ नये म्हणून महानगरपालिकेमार्फत तेथील जलजोडण्या मार्च, २०१६, जून, २०१६ व सप्टेंबर, २०१६ मध्ये खंडीत करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बुलढाणा जिल्हयात उडीद दाळीची खरेदी बंद केल्याबाबत**

**(२८) * २७४४६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयात हमी भावासह बोनस देऊन नाफेडमार्फत सुरू करण्यात आलेली उडीद दाळीची खरेदी बंद केल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाफेडने खरेदी बंद करण्याची सूचना आठ दिवस अगोदर देणे आवश्यक असताना कोणतीही पूर्वसूचना न देता दुसऱ्याच दिवशी खरेदी बंद केल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रति क्विंटल रूपये ५०० ते ७०० इतके नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळण्याच्यादृष्टीने सदर खरेदी केंद्र पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) केंद्र शासनाने हंगाम २०१६-१७ साठी उडीदाकरिता रुपये ४५७५ + रुपये ४२५ बोनस अशी एकूण रुपये ५०००/- किमान आधारभूत किंमत जाहीर केली आहे. तथापि नाफेडच्यावतीने राज्यात उडीदाची खरेदी किमान स्थिरता निधी अंतर्गत खुल्या बाजारभावाने केली आहे.
(२) व (३) नाफेडने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील उडीदाची खरेदी बंद केली आहे. तथापि भारतीय अन्न महामंडळामार्फत अद्याप उडीदाची खरेदी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मुलुंड (पश्चिम) विणानगर येथील विद्युत वाहिनी खांबाभोवती स्थानिक सामाजिक संस्थेने केलेले अतिक्रमण**

**(२९) * २७३८५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मुलुंड (पश्चिम) येथील विणानगर, छोटा उड्डाण पूल व जलवाहिनी जवळ महाराष्ट्र विद्युत महावितरण कंपनीच्या विद्युत वाहिनी खांबाभोवती स्थानिक सामाजिक संस्थेने तारेचे कुंपन घालून प्रसाधनगृह व कच्च्या-पक्क्या स्वरुपाचे समाजभवन बांधून मागील अनेक वर्षांपासून अतिक्रमण केले असल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीजेच्या खांबामधून वीज वहन प्रक्रियेत शॉटशर्किट झाल्यास, समाजभवनात येणारे भाविक तसेच तेथून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत तेथील नागरिकांनी मुख्य अभियंता, महावितरण कंपनी, भांडुप, मुंबई, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग व मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने तसेच नियमबाह्य बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर ठिकाणी महावितरण कंपनीच्या विद्युत वाहिनीच्या टॉवरभोवती लोखंडी जाळीचे कुंपण घातल्याचे दिसून येते.

(२) महावितरणच्या भांडुप नागरी परिमंडळांतर्गत ठाणे नागरी मंडळांतर्गत मुलुंड विभागात सदर जागेवर २२ के.व्ही. ठाणे-१ टॉवर लाईन २२०/२२ के.व्ही टाटा साळशेत उच्चदाब उपकेंद्र येथून वागळे इस्टेट विभागासाठी मुलुंड विभागाच्या हद्दीतून जाते. पांचरस्ता उपविभागांतर्गत विणानगर येथे मुंबई महानगरपालिकेच्या मोठया जलवाहिन्या पार करण्यासाठी बांधण्यात आलेला पूल वरील टॉवर वाहिनीच्या खाली आहे. सदरचा पूल आणि वाहिनी व वाहिनी आणि समाजभवन यात सुरक्षित अंतर राखण्यात आलेले आहे.

(३) याबाबत कोणतीही तक्रार अथवा निवेदन ऊर्जा विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम अदा करण्याबाबत**

**(३०) * २९९२० श्री.नारायण राणे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१६ या ३ महिन्यांच्या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रतीक्विंटल दोनशे रुपये व जास्तीत जास्त २५ क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय शासनाने दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय, त्यानुसार अद्यापपर्यंत किती शेतकऱ्यांना अनुदान देण्यात आले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) पात्र लाभार्थ्यांची संख्या व त्यांना द्यावयाच्या अनुदानासाठी लागणारा एकूण निधी याबाबतची माहिती पणन संचालक, पुणे यांच्याकडून मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त होताच पुढील कार्यवाही करता येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती बाजार समितीमध्ये सोयाबीन विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत**

**(३१) * २८०६१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती बाजार समितीमध्ये माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान सोयाबीन विकणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून प्रतिक्विंटल रुपये २००/- अनुदान देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुदानापासून व्यापाऱ्यांना सोयाबीन विक्री करणारे शेतकरी वंचित रहाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सातबाऱ्यावरील सोयाबीनच्या नोंदीनुसार सर्वच शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय

(२) व (३) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डमध्ये सोयाबीन विक्री केलेल्या शेतकऱ्यांनाच अनुदान देय आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भ - मराठवाडयाच्या धर्तीवर नाशिक भागातील उद्योगांनाही सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) * २८३६३ डॉ.अपूर्व हिरे, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १५२७८ ला दिनांक २१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ आणि मराठवाडा विभागातील उद्योगांना पुरविल्या जाणाऱ्या वीज दरांचे सुसूत्रिकरण करणेसंबंधी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची छाननी करून मुख्य बाबी निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ-मराठवाडयाप्रमाणे नाशिक विभागातील उद्योगांनाही सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करुन देण्याची मागणी नाशिक येथील उद्योजकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समितीने उपयुक्त मुख्य बाबी निश्चित करून शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) विदर्भ व मराठवाडयातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी सवलतीच्या दराने वीज दर लागू करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर आंतरविभागीय समितीच्या अहवालातील शिफारशींची छाननी करुन उपयुक्त मुख्य बाबी निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सचिव समिती गठीत करण्यात आली होती.
(२), (३), व (४) सदर दोन्ही समितींच्या शिफारशींवर अंतिम निर्णय घेण्याकरिता दिनांक ४ जून, २०१६ च्या शासन निर्णयान्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली. सदर मंत्रीमंडळ उपसमितीने सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय करुन राज्यातील विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतचे आदेश, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दिनांक २९ जून, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ झोन या क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना इंधन समायोजन आकार, उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत तसेच नवीन उद्योगांना प्रोत्साहनपर सवलत देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या आहाराच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत**

**(३३) * २७०२९ प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत २५६ आश्रमशाळांमध्ये ८० हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून, सदर विद्यार्थ्यांना दररोज आहारासाठी केवळ रूपये ३० इतकी रक्कम देण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार देणे शक्य होत नसल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा बौध्दिक व शारिरीक विकास होणे आवश्यक असल्याने विद्यार्थ्यांच्या आहाराच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, अंशतः खरे आहे.

राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत ५४६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून सदर शाळांमध्ये सुमारे २,५३,००० इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनुदानित आश्रमशाळांना प्रतिविद्यार्थी दरमहा रुपये ९००/- इतके परिपोषण अनुदान देण्यात येते.

(२) अनुदानित संस्थांमधील निवासी विद्यार्थ्यांच्या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०१ मार्च, २०१६ रोजीच्या आदेशान्वये मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर अभ्यासगटाच्या शिफारसी प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार परिपोषण अनुदानात वाढ करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परिट धोबी समाजाचा अनुसूचित जाती प्रवर्गात समावेश करण्याबाबत**

**(३४) * २९३८३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिट धोबी समाजाचा अनुसूचित जाती प्रवर्गात समावेश करण्यासाठी नेमलेल्या डॉ. दशरथ भांडे यांच्या समितीचा अहवाल ग्राहय धरून केंद्रीय सामाजिक न्याय विभागाकडे शिफारस करण्याच्या मागणीसाठी परभणी जिल्हयासह राज्यातील समाजबांधवांनी सन २०१६ मध्ये राज्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलने केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त परीट धोबी समाजाचा अनुसूचित जाती प्रवर्गात समावेश करणे व इतर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे आहे.

(२) "धोबी" जातीचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीत करावा या विषयी प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने सदर बाब तपासण्याकरिता डॉ. डी.एम.भांडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ५/९/२००१ मध्ये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक ५ मार्च, २००२ रोजी शासनास सादर केला होता. त्या समितीने धोबी व तत्सम समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करावा अशी शिफारस केली होती.

सदर अहवाल केंद्र शासनाकडे शिफारस करण्यासाठी मा.मंत्री (सा.न्याय) यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीपुढे ठेवण्यात आला असता अनुसूचित जातीबाबत अभ्यास करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून याबाबत अभिप्राय मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यास अनुसरुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून दिनांक १३/५/२००२ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, अनुसूचित जातीच्या यादीत एखाद्या जातीचा समावेश करण्यासाठी असलेला "अस्पृश्यता" हा निकष धोबी जात पूर्ण करीत नाही.

मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार सदरचे दोन्ही अहवाल दिनांक १३/४/२००५ च्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. केंद्र शासनाकडून या प्रकरणी अद्यापी निर्णय प्रलंबित आहे. सदर प्रकरणी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या**
**वीज ग्राहकांना दरवाढ रद्द करण्याबाबत**

**(३५) * ३०३५६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या वीज ग्राहकांना दिनांक १ नोव्हेंबर, २०१६ पासून लागू केलेली दीड टक्का वीज दरवाढ पुढील चार वर्षापर्यंत कायम राहणार असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वीज दरवाढीमुळे घरगुती ग्राहकांचा स्थिर वीज बिल आकार रुपये ५० वरुन रुपये ५५ होणार असून त्यात साधारणपणे ५ रुपयांची वाढ होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त दरवाढ रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने महावितरणच्या ग्राहकांकरिता सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या कालावधीकरिता वीज दर निश्चित केले असून या कालावधीत वीज दरात सरासरी १.२% ते २% इतकी वाढ झाली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार राज्यातील वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. विहीत कार्यपध्दतीनुसार सर्व संबंधितांचे म्हणणे विचारात घेऊन आयोगाकडून वीजदर निश्चित केले जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वागळे इस्टेट (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडावर बांधलेल्या अनधिकृत गाळयांबाबत**

**(३६) * ३०१४७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वागळे इस्टेट (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीतील भूखंड क्र.२७ तसेच रोड नं. २२ व १६ चौकाजवळील रस्त्यांवर बेकायदेशीररित्या अनधिकृत गाळे बांधल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची कोणतीही परवानगी न घेता सदर अनधिकृत गाळे भाड्याने दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर अनधिकृत गाळे तात्काळ निष्कासित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) महामंडळाच्या वागळे औद्योगिक क्षेत्रात भूखंड क्र. अे-२७, बी २७ मध्ये अनधिकृत गाळे नाहीत. रोड नंबर २२ चौकाजवळील २ गाळे व २ पानबिडी शॉप असे ४ तसेच रोड नंबर १६ लगत २ गाळे महामंडळाने भाडेतत्वावर वितरीत केले आहेत. या औद्योगिक क्षेत्रातील रस्ते, ठाणे महानगरपालिकेस देखभाल व दुरुस्तीकरीता सन १९७० मध्ये हस्तांतरीत केले आहेत.

महामंडळाच्या ज्या गाळेधारकांनी अनधिकृत बांधकामे केली आहेत, त्यांना महामंडळाने दिनांक ५/१२/२०१६ व दिनांक २/२/२०१७ रोजी एमआर ॲण्ड टीपी अंतर्गत नोटीसा बजावण्यात आल्या असून इतर अनधिकृत बांधकामाबाबत सुध्दा नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोईसर (ता.जि.पालघर) येथे दारुबंदी घोषित करण्याबाबत**

**(३७) * २७५२१ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथे आदिवासी श्रमिक महिला मंडळाने सर्व प्रकारची दारुबंदी घोषित करण्याची मागणी दिनांक ६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास ग्रामसभेत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ग्रामसभेत दारुबंदीवर चर्चा होऊन सर्वसंमतीने मद्यविक्री परवान्यांचे नुतनीकरण न करणे व ना हरकत प्रमाणपत्र न देणे यासाठी करण्यात आलेल्या ठरावाचे पालन न करता चुकीचा ठराव लिहून मद्य व्यावसायिकांच्या फायद्याचे धोरण राबवित असल्याचा आरोप श्रमिक महिला मंडळामार्फत होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ग्रामपंचायत आदिवासी उपयोजना क्षेत्रात असताना दारुबंदीचा ठराव जिल्हाधिकारी, पालघर, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क व दारुबंदी विभागाकडे पाठविणे बंधनकारक असताना तो जाणीवपूर्वक पाठविण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ग्रामसेवक सरपंच व पदाधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

सदरची मागणी आदिवासी श्रमिक महिला मंडळाने दिनांक १२/०८/२०१६ रोजी ग्रामपंचायतीकडे केली आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून प्राप्त झालेल्या दिनांक २६/०४/२०१६ च्या अर्जावर दिनांक ०६/०५/२०१६ च्या ग्रामसभेमध्ये चर्चा करताना मद्यविक्री परवान्याचे नुतनीकरण न करणे व ना-हरकत प्रमाणपत्र न देणे याबाबत ठराव मंजूर करण्यात आला. दारुबंदीबाबत ठराव झाला नाही. आदिवासी श्रमिक महिला मंडळाने त्याच्या प्रश्न-१ मध्ये नमुद पत्रान्वये दिनांक ०६/०५/२०१६ रोजीच्या ग्रामसभेत झालेल्या मद्यविक्री परवान्यांचे नुतनीकरण न करणे व ना-हकरकत दाखला न देणेबाबत झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची विनंती केली आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक ६/०५/२०१६ रोजीच्या ग्रामसभेमध्ये दारुबंदीबाबत ठराव झालेला नसल्याने व मद्यविक्री परवान्याचे नुतनीकरण न करणे व ना-हरकत प्रमाणपत्र न देणेबाबत ठराव झालेला असल्याने, दारुबंदीबाबतचा ठराव जिल्हाधिकारी, पालघर, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क व दारुबंदी विभागाकडे पाठविण्यात आलेला नाही.

(४) व (५) दिनांक ०६/०५/२०१६ रोजीच्या ग्रामसभेचा अध्यक्ष व सचिव यांचा खुलासा घेऊन उचित कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

**अकलूज (जि.सोलापूर) बाजार समिती वाहन चालकांकडून बेकायदेशीर वसूली सुरू असल्याबाबत**

**(३८) * २८९९७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकलूज (जि.सोलापूर) बाजार समितीने स्वत:च्या शेतीमालाच्या आणि साखर कारखान्यांच्या वजनकाट्यावर शेतीमालाच्या वाहन चालकांकडून सेसच्या नावाखाली वसुली कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन वसूली सुरु केली असल्याचे माहे फेबुवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीकडून सेसच्या नावाखाली कोणत्याही कायदेशीर हिशेबाशिवाय मोघम रक्कम वसूल करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेसच्या नावाने बेकायदेशीरपणे रक्कम वसूल करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) वाहन चालकाकडून सेसच्या नावाखाली वसूली कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन वसूली सुरु असल्याची बातमी दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे.

फळे व भाजीपाला नियमन मुक्तीनंतर बाजार समितीच्या आवाराबाहेरील व्यापाऱ्यांकडून बाजार फीची वसूली करण्यात येत नाही. तथापि बाजार समितीच्या वजनकाट्यावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्याने गाडीतील मालाची तपासणी न करताच वाहन चालकाच्या मागणीप्रमाणे बाजार फीची परस्पर वसूली केली आहे. सदर बाब बाजार समितीच्या निदर्शनास आल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे.

साखर कारखान्याच्या वजन काट्यावर बाजार समितीने कोणत्याही कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत**

**(३९) * २८३६५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४५९४ ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या मान्यता प्राप्त वसतिगृहातील अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याचा निर्णय शासन घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयानुसार शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) राज्यातील अनुदानित वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या मानधन दरात शासन निर्णय दिनांक १५/०६/२०१३ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. तद्नंतर वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील मागास प्रवर्गातील विद्यार्थीनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(४०) * २७२४६ प्रा.अनिल सोले, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात वर्ग आठवी ते दहावीमध्ये शिकणा-या मागासवर्गातील साडेतीन हजार पात्र विद्यार्थीनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर विद्यार्थीनीना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) सदर योजनेतील प्रलंबित अर्ज प्राधान्याने निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.